SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists

Estd : 1962
" A++" Accrediated by NAAC (2021) With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र.शिवाजी वि./संलग्नता/टी-२/एसव्हीएम/वि.प.वि.क्र.२८ दि.२६/०६/२०२३/ दि.

30 JUN 2023

No 647

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक,
डी. वाय.पाटील प्रतिष्ठाणचे
कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,
साळोखेनगर, कोल्हापूर

**विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.**

**संदर्भ : आपले जा.क्र.** DYPCOE/२०२२-२३/६१४ दि. २९/०८/२०२२ **रोजीचा प्रस्ताव.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, २०२३पासून खालील संलग्नीकरण प्रकार व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. स्थानिक चौकशी समितीने नमुद केलेल्या अटी पुर्ततेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाकडून सदर प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम/शाखा | विद्यापीठाची मान्यता | ६५% पेक्षा कमी गुणांकन प्राप्त झालेले वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | नुतनीकरण | **S.E.**१.कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग (डेटा सायन्स)(६०)<br>**T.E.**१.इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग (६०)<br>**T.E.**१.कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग (डेटा सायन्स)(६०)-<br>**B.E.**-१.इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग (६०)<br>**F.E.**कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग (६० to १२०)<br>**S.E.**कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग (६० to १२०) | जून २०२३पासून एका वर्षासाठी | निरंक |
| २. | नैसर्गिक विस्तार | कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग(T.E.) (६० to १२०)<br>कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग (डेटा सायन्स)(६०) (B.E.) | | |

**स्थानिक चौकशी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. Appointment of approved Librarian
२. Appintment of Approved Faculty
३. Students shall be encourage to participate in cocurricular and extra curricular activities.

...२

टिप :

१. नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार प्रस्तावाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी विद्यापीठास सादर केलेल्या गुणांकनानुसार, छाननी समितीने दिलेला अभिप्राय व आपल्या महाविद्यालयास नियमित प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक (आवश्यकतेनुसार) आणि सबंधित अभ्यासक्रमामध्ये आवश्यक असणा-या शिक्षक पदांच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत केलेल्या नियुक्त्या, शिक्षकेत्तर पदांच्या नियुक्त्या आणि इतर उपलब्ध आवश्यक भौतिक सुविधा इ. अवलोकनी घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार यास मान्यता दिली आहे.

२. आपल्या महाविद्यालयास/संस्थेस आवश्यक असणारे नॅक/एनबीए मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन केले नसल्यास ते त्वरित करून घेणे बंधनकारक राहील. याबाबतची पूर्तता झाली नसल्यास पुढील नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून पुढील सलग तीन वर्षामध्ये प्रपत्र 'अ', 'ब' किंवा 'क' मध्ये ६५% पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १२० अन्वये संलग्नीकरण रद्द करण्याबाबतच्या प्रक्रियेचा प्रस्ताव विद्यापीठ अधिकार मंडळासमोर सादर करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची/नैसर्गिक विस्ताराची मान्यता ही छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.** त्या अटींची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता/टी-२ विभाग

प्रत :- १. पात्रता विभाग, २. संबंधित परीक्षा विभाग, ३. परीक्षक नियुक्ती विभाग,
४. अभ्यास मंडळे विभाग, ५. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग, ६. पी.जी. प्रवेश.